PDCC BANK
# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे
मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.
* पो. बॉक्स नं.१०९ * दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३९३००. ई-मेल: ho@pdccbank.com

## निविदा – सूचना

**मोहोरबंद निविदा दि.१४.०३.२०२४ ते दि.२०.०३.२०२४ रोजी सकाळी १०.३० वा. ते सायं ५.३० वाजेपर्यंत प्रशासन विभाग, मुख्यकचेरी येथे स्विकारण्यात येतील. त्यानंतर दाखल होणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही.**

बँकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे करार पध्दतीवर तीन वर्षाकरीता सेवा पुरविणेकामी नोंदणीकृत मान्यताप्राप्त व बँकींग अस्थापनांस सेवा पुरविण्याऱ्या विशेष अनुभवी एजन्सीकडून मोहोरबंद निविदा (दरपत्रके) मागविण्यात येत आहेत. बँकेच्या पुणे जिल्ह्यात एकूण २९० शाखा ४ विस्तारित कक्ष, १५ झोनल ऑफिस व मुख्य कार्यालय इ. कार्यरत आहेत. अटी व शर्तींच्या सेवांचा तपशिल खालीलप्रमाणे...

**अ) (I) बँकेच्या मुख्यकचेरी व शाखांकरीता डेटाएंट्री ऑपरेटर, रेकॉर्ड किपर/हाऊस किपर, आर्थिक साक्षरता समन्वयक, चक्रधर इ. मनुष्यबळ सेवांच्या कामकाजाचे स्वरुप व अटी शर्ती.**

१) बँकेच्या मुख्यकचेरी व शाखांकरीता डेटाएंट्री ऑपरेटर, रेकॉर्ड किपर/हाऊस किपर, आर्थिक साक्षरता समन्वयक, चक्रधर व्यवस्था इ. सेवांकरीता आवश्यकतेनुसार मनुष्यबळाची व्यवस्था करावी लागेल.

२) कंत्राटी एजन्सीने फिडीलिटी गॅरंटी विमा घेणे आवश्यक राहील, तसेच विमा कंपनीने दिलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक राहील.

३) कंत्राटी व्यक्तीची नियुक्ती करताना सदर व्यक्तीने कोणत्याही बँकेच्या कॉन्ट्रक्ट एजन्सीकडे कामकाज केल्याचा अनुभव असावा, नियुक्ती वेळी चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे. तसेच कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.

४) कंत्राटी व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा न्यायालयीन दावा या बँकेविरुध्द अथवा बँकेने त्यांच्या विरुध्द केलेला न्यायालयीन दावा प्रलंबित नसावा.

५) नियुक्त कॉन्ट्रक्ट एजन्सीने कंत्राटी व्यक्तीद्वारे दोन प्रतिष्ठीत व्यक्तींची शिफारस घ्यावी.

६) कंत्राटी व्यक्ती हा पुणे जिल्हयातील रहिवाशी असावा. तसेच सदर कंत्राटी व्यक्तींची पार्श्वभूमी योग्यप्रकारे तपासून त्याचा कायमचा पत्ता, आधारकार्ड तसेच के.वाय.सी. ची माहिती रेकॉर्ड वर घ्यावी.

७) कंत्राटी व्यक्ती डेटाएंट्री ऑपरेटर व आर्थिक साक्षरता समन्वयक पदाच्या कामकाजासाठी किमान कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण असावी. रेकॉर्ड किपर/हाऊस किपर किमान १० वी उत्तीर्ण असावा व वाहतुक देखभाल (चक्रधर) किमान ८ वी उत्तीर्ण असावा. चक्रधर पदाच्या व्यक्तीकडे लाईट मोटार व्हेईकल ट्रान्सपोर्ट (LMV-TR) परवाना असावा.

८) **कंत्राटी एजन्सीला बँकिंग/महानगरपालिका क्षेत्रात डेटाऍंट्री ऑपरेटर, रेकॉर्ड किपर/हाऊस किपर इ. प्रशिक्षित सेवेचा किमान ७ वर्ष कामकाजाचा अनुभव असावा व सदर कंपनी कायदेअंतर्गत नोंदणी झालेली असावी. (Annexure I – Envelope-1)**

९) **सदर कंत्राटी एजन्सीचे किमान रु.१०.०० कोटी पर्यंत नेटवर्थ असणे आवश्यक आहे. याबाबतचे मागील ३ आर्थिक वर्षाचे चार्टर्ड अकाऊंटंट (सी.ए.) यांचेकडील टर्न ओव्हर प्रमाणपत्र दाखल करावे. (Annexure II – Envelope-1)**

१०) बँकेने निश्चित केलेली रक्कम रू. ५.०० लाख सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

११) सदर कंत्राटी व्यक्तीकडून बँक कामकाज करीत असताना बँकेस झालेल्या नुकसान/फसवणूकीस नियुक्त एजन्सीस जबाबदार धरण्यात येईल. सदर तोटा नियुक्त एजन्सीकडून वसुल करण्यात येईल.

१२) उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

..२..

अ) (II) **बँकेच्या शाखांकरीता कॅशिअर सपोर्ट कामकाजाचे स्वरुप व अटी शर्ती.**

१) बँकेच्या शाखांकरीता कॅशिअर सपोर्ट आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरविण्याची व्यवस्था करावी लागेल.

२) कंत्राटी एजन्सीने फिडीलिटी गॅरंटी विमा घेणे आवश्यक राहील, तसेच विमा कंपनीने दिलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक राहील.

३) कंत्राटी व्यक्तीची नियुक्ती करताना सदर व्यक्तीने कोणत्याही बँकेच्या कॉन्ट्रक्ट एजन्सीकडे एकत्रीत किमान ५ वर्ष कामकाज केलेले असावे, सदर उमेदवाराचे वय २८ वर्षापेक्षा अधिक असावे, नियुक्ती वेळी चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे. तसेच कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.

४) कंत्राटी व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा न्यायालयीन दावा या बँकेविरुध्द अथवा बँकेने त्यांच्या विरुध्द केलेला न्यायालयीन दावा प्रलंबित नसावा.

५) नियुक्त कॉन्ट्रक्ट एजन्सीने कंत्राटी व्यक्तीद्वारे दोन प्रतिष्ठीत व्यक्तींची शिफारस घ्यावी.

६) कंत्राटी व्यक्ती हा पुणे जिल्हयातील किमान १५ वर्षाचा रहिवाशी असावा. तसेच सदर कंत्राटी व्यक्तींची प्राश्वभूमी योग्यप्रकारे तपासून त्याचा कायमचा पत्ता, आधारकार्ड तसेच के.वाय.सी. ची माहिती रेकॉर्ड वर घ्यावी.

७) कंत्राटी व्यक्ती कॅशिअर सपोर्ट पदाच्या कामकाजासाठी किमान कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण असावी.

८) <u>कंत्राटी एजन्सीला बँकिंग/महानगरपालिका क्षेत्रात डेटाऐंट्री ऑपरेटर, रेकॉर्ड किपर/हाऊस किपर इ. प्रशिक्षित सेवेचा किमान ७ वर्ष कामकाजाचा अनुभव असावा व सदर कंपनी कायदेअंतर्गत नोंदणी झालेली असावी. (**Annexure I – Envelope-1**)</u>

९) <u>सदर कंत्राटी एजन्सीचे किमान रु.१०.०० कोटी पर्यंत नेटवर्थ असणे आवश्यक आहे. याबाबतचे मागील ३ आर्थिक वर्षाचे चार्टड अकाऊंटंट (सी.ए.) यांचेकडील टर्न ओव्हर प्रमाणपत्र दाखल करावे. (**Annexure II – Envelope-1**)</u>

१०) बँकेने निश्चित केलेली रक्कम रू. ५.०० लाख सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

११) सदर कंत्राटी व्यक्तीकडून कॅश हताळणी करताना बँकेस झालेल्या नुकसान/फसवणूकीस नियुक्त एजन्सीस जबाबदार धरण्यात येईल. सदर तोटा नियुक्त एजन्सीकडून वसुल करण्यात येईल.

१२) उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

ब) **बँकेच्या मुख्यकचेरी/शाखांकरीता सिक्युरिटीगार्ड कामकाजाचे स्वरुप व अटी शर्ती.**

१) बँकेच्या एकूण २९० शाखा, ४ विस्तारित कक्ष, १५ झोनल ऑफिस व मुख्य कार्यालय इ. करीता आवश्यकतेनुसार साधे सुरक्षारक्षक पुरविण्याची व्यवस्था करावी लागेल.

२) सिक्युरिटी गार्डस् हे सुदृढ व प्रशिक्षित असावेत. तसेच किमान उंची १६० से.मी., छाती ८० से.मी. व वजन ५० कि.ग्रॅ. तसेच त्याचे वय ५० वर्षा पेक्षा जास्त नसावे. नियुक्तीवेळी चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे लागेल. कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.

३) एजन्सीकडे महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाची सूट/नोंदणी असणे आवश्यक आहे.

४) प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज् रेग्युलेशन ॲक्ट २००५ अन्वये परवाना असणे आवश्यक आहे.

५) सिक्युरिटी गार्ड एजन्सीकडे बँकांना गार्ड पुरविण्याचा अनुभव असावा.

६) सदर कंत्राटी एजन्सीचे किमान रु.१.०० कोटी पर्यंत नेटवर्थ असणे आवश्यक आहे. याबाबतचे मागील ३ आर्थिक वर्षाचे चार्टड अकाऊंटंट (सी.ए.) यांचेकडील टर्न ओव्हर प्रमाणपत्र दाखल करावे. (Annexure II – Envelope-1)

७) बँकेने निश्चित केलेली रक्कम रू. ५.०० लाख सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

८) बँकेच्या बहुतांश शाखा ग्रामीण भागात असल्याने तेथे सिक्युरिटी गार्ड यांना कामकाज करावे लागेल.

९) उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

**क) बँकेच्या मुख्यकचेरी /ठराविक शाखांकरीता गनमॅन (बंदुकधारी) सिक्युरिटीगार्ड कामकाजाचे स्वरुप व अटी शर्ती.**

१) बँकेच्या मुख्यकचेरी व १५ झोनल ऑफिस संलग्न शाखांकरीता इ. करीता आवश्यकतेनुसार गनमॅन (बंदुकधारी) सिक्युरिटी गार्डची व्यवस्था करावी लागेल.

२) गनमॅन (बंदुकधारी) सिक्युरिटी गार्डस् हे सुदृढ, प्रशिक्षित व बंदुकधारी परवानाधारक असावेत. तसेच किमान उंची १६० से.मी., छाती ८० से.मी., वजन ५० कि.ग्रॅ. व वय ५० वर्षा पेक्षा जास्त नसावे. नियुक्तीवेळी चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे लागेल. कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.

३) एजन्सीकडे महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाची सूट/नोंदणी असणे आवश्यक आहे.

४) प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज् रेग्युलेशन ॲक्ट २००५ अन्वये परवाना असणे आवश्यक आहे.

५) गनमॅन (बंदुकधारी) सिक्युरिटी गार्ड एजन्सीकडे बँकांना गनमॅन (बंदुकधारी) गार्ड पुरविण्याचा अनुभव असावा.

६) सदर कंत्राटी एजन्सीचे किमान रु.१.०० कोटी पर्यंत नेटवर्थ असणे आवश्यक आहे. याबाबतचे मागील ३ आर्थिक वर्षाचे चार्टड अकाऊंटंट (सी.ए.) यांचेकडील टर्न ओव्हर प्रमाणपत्र दाखल करावे. (Annexure II – Envelope-1)

७) बँकेने निश्चित केलेली रक्कम रू.२.५० लाख सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

८) उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

**ड) सी.सी.टी.व्ही. मॉनेटरिंग कामकाजाचे स्वरुप व अटी शर्ती.**

१) बँकेच्या मुख्यकचेरीकरीता किमान आवश्यकतेनुसार सी.सी.टी.व्ही. मॉनेटरिंग व्यक्तींची व्यवस्था करणेबाबत.

२) शाखांकडील अडीअडचणीं संदर्भात फोन घेणे व शाखेच्या अडचणी दूर करणे.

३) शाखांकडील कॅमेरे बंद असल्यास इंजिनिअर पाठवून कॅमेरे दुरुस्त करणे.

४) शाखांकडील नियुक्त सुरक्षारक्षक यांच्या हलचालीवर देखरेख ठेवणे.

५) शाखांकडील दैनंदिन व्यवहारावर देखरेख करणे.

६) शाखांकडील सी.सी.टी.व्ही. रेकॉर्डींग चेक करणे.

७) सी.सी.टी.व्ही. मार्फत शाखांमध्ये काही अनपेक्षित घटना घडल्यास सदर बाबींची खात्री करण्यासाठी सी.सी.टी.व्ही. रेकॉर्डींगची मदत घेण्यात येते. इ. कामे मुख्यकचेरीकडील सी.सी.टी.व्ही. मॉनेटरिंग विभागामार्फत केले जाते.

८) सी.सी.टी.व्ही.मॉनेटरिंग एजन्सीकडे बँका, शासनातील विविध विभाग यांना मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव असावा. कंत्राटी व्यक्तीची नियुक्ती करताना चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे. तसेच कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.

९) बँकेने निश्चित केलेली रक्कम रू.५०,०००/– सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

१०)सी.सी.टी.व्ही. मॉनेटरिंग व्यक्ती हे प्रशिक्षित असावेत व तांत्रिक (टेक्निकल) पदवीधर असावे.

११)उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

इ) हाऊस किपिंग कामकाजाचे स्वरुप व अटी शर्ती.

१) बँकेच्या मुख्यकचेरी व झोनल ऑफिस करीता आवश्यकतेनुसार हाऊस किपिंग व्यक्तींची व्यवस्था करणेबाबत.
२) मुख्य कचेरी कार्यालयातील सर्व विभाग/स्वच्छतागृहाची साफसफाई करणे तसेच साफसफाई करीत असताना अत्याधुनिक मशनरींचा वापर करण्यात यावा उदाः फ्लोअर स्क्रबर मशीन, व्हॅक्युम मशीन, जेट मशीन इ. चा वापर करावा.
३) मुख्यकचेरी कार्यालयाचे आवार ,पार्किंग व सभागृहाची साफसफाई करणे.
४) कंत्राटी कामगार हा प्रशिक्षित /अनुभवी असावा.
५) हाऊस किपिंग एजन्सीकडे बँका, शासनातील विविध विभाग यांना मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव असावा.
६) बँकेने निश्चित केलेली रक्कम रू. २.०० लाख सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.
७) कंत्राटी व्यक्तीची नियुक्ती करताना चारित्र्य प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे. तसेच कंत्राटी एजन्सीने गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या/अफरातफर केलेल्या व्यक्तीची नियुक्ती करु नये.
८) उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी सदर कंत्राटी एजन्सीची राहील.

## आवश्यक कागदपत्रे व माहिती

१) उपरोक्त अ,ब,क,ड व इ करीता वेगवेगळया सिलबंद निविदा दाखल करणे आवश्यक आहे. अ,ब,क,ड व इ करीता स्वतंत्र निविदा शुल्क रक्कम रु.५,०००/– रोखीने बँकेच्या बी.जे.रोड शाखेमध्ये छपाई खात्यामध्ये जमा करून कोरी निविदा दि.१४.०३.२०२४ ते दि.२०.०३.२०२४ या कालावधीत कार्यालयीन कामकाज वेळेत प्रशासन विभागामध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. निविदा शुल्क रक्कम ना–परतावा असेल.
२) सिलबंद निविदा (Technical) पाकिट क्र. १ व सिलबंद निविदा (Price Bid) पाकिट क्र.२ मध्ये बँकेच्या प्रशासन विभागाकडे दि.१४.०३.२०२४ ते दि.२०.०३.२०२४ रोजीपर्यंत सकाळी १०.३० ते सांय. ५.३० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.
३) दि.२२.०३.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता Technical निविदा उघडण्यात येणार असुन संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. सदर दिवशी संस्थेचा अधिकृत प्रतिनिधी आवश्यक त्या मुळ कागदपत्रांसहीत बँकेच्या प्रशासन विभाग मुख्यकचेरी येथे उपस्थित रहावे.
४) निविदा सुचना मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या संस्था निविदा दाखल करण्यास पात्र होवू शकेल. पात्र संस्थांनी सिलबंद निविदा (Technical) पाकिट क्र. १ मध्ये आवश्यक कागदपत्र व परिशिष्टासह दाखल करावी. (Envelope-1)
५) महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार वेगवेगळया झोनकरीता विहीत नमुन्यात सिलबंद निविदा (Price Bid) पाकिट क्र. २ मध्ये दाखल करावेत. (Annexure V – Envelope-2)
६) ज्या संस्था Technical निविदा मधील नमुद अटी शर्ती पूर्ण करतील. त्याच संस्थांचे Price Bid उघडण्यात येतील.
७) शासनाचे नोंदणी प्रमाणपत्र, इन्कम टॅक्स व जीएसटी अंतर्गत नोंदणीप्रमाणपत्र, आयकर रिटर्न दाखल केल्याचा पुरावा इ.
८) कंत्राटी एजन्सीला बँकिंग क्षेत्रातील मान्यता प्राप्त संस्थेकडे कामकाजाचा अनुभव असावा. अनुभव प्रमाणपत्रासह सोबत विहित नमुन्यातील सोबत परिशिष्ट–१ सादर करावे. (Annexure I – Envelope-1)

९) इनकम टॅक्स ॲक्ट, प्रॉव्हिडंट फंड ॲक्ट, ई.एस्.आय्.सी./वर्कमन कॉम्पेन्सेशन ॲक्ट, लेबर रेग्युलेशन ॲक्ट व महाराष्ट्र शासन किमान वेतन कायदा इ. संबंधित कायद्यातील तरतूदींचे पालन करणे सदर संस्थेवर बंधनकारक राहील.

१०) सर्व्हिस चार्ज, इन्कमटॅक्स ॲक्ट मधील टी.डी.एस्. व जी.एस.टी. बाबतच्या तरतूदी विचारात घेऊन शुल्कदर स्वतंत्रपणे नमूद करण्यात यावेत. तसेच शासनाचे वेळोवेळी कायद्यानुसार होणारे बदल आपणास बंधनकारक राहतील.

११) बँकेने निविदा सूचनामध्ये जाहीर केलेल्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत विहित नमुन्यातील स्वःघोषणापत्र देणे आवश्यक आहे. (Annexure III – Envelope-1)

१२) सदर संस्थेवर मागील काळात कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये खटला दाखल झालेला नसावा किंवा सदर संस्थेस शासनाने काळया यादीत (Black List) टाकलेले नसावे. याबाबत विहीत नमुन्यातील स्वःघोषणापत्र देणे आवश्यक आहे. (Annexure IV – Envelope-1)

१३) कंत्राटी व्यक्तीची कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे.

१४) सर्वात कमी रकमेचे दरपत्रक मान्य करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही.

१५) सर्वात कमी रकमेचे दरपत्रक मान्य करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही. सदर संस्थेला असणारा अनुभव व मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता विचारात घेऊन संस्थेची निवड केली जाईल.

१६) निविदांमधील नमुद सेवांकरीता आवश्यक मनुष्यबळ गरजेनुसार कमी जास्त करण्याचा अधिकार बँकेस राहील.

१७) बँकेने संमत केलेल्या विहित नमुन्यात करार करणे बंधनकारक राहील.

१८) निवड झालेल्या संस्थेस बँकेने निश्चित केलेली रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँकेत जमा करणे बंधनकारक राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

१९) कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार करणाऱ्या संस्थेला काळया यादीत (Black List) टाकण्यात येईल व सदर संस्थेच्या निविदा रद्द करण्यात येतील.

२०) संस्थेस लागू असलेले ऑडीट दरवर्षी करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील व सदर ऑडीट रिपोर्ट रितसर बँकेकडे दाखल करण्यात यावा.

२१) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार बँकेचा राहील. तसेच सर्व अगर कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

२२) वरील अटी व शर्तीमध्ये वाढ/कमी/दुरुस्त करण्याचा अथवा संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

(स्वाक्षरी)
अनिरुद्ध य. देसाई
मुख्य कार्यकारी अधिकारी